01 APR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रवेश घेतानाच मिळणार विद्यार्थ्यांना पुस्तके

## विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागाची तयारी

■ सकाळ वृत्तसेवा


पुस्तकांविनाच परीक्षा द्यायची काय?

विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागातील विद्यार्थ्यांचा सवाल; दुसरे सत्र आले संपत

कोल्हापूर, ता. ३१ : नव्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतानाच बी. ए., एम. ए. च्या विविध अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्याची पुस्तके दिली जाणार आहेत. त्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागाने आतापासूनच तयारी सुरू केली आहे.

या विभागात विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची अभ्यास, परीक्षेच्या तयारीबाबत होत असलेली अडचण 'सकाळ' ने २० मार्च रोजीच्या अंकात 'पुस्तकांविनाच परीक्षा द्यायची काय?' या वृत्तातून मांडली. त्याची दखल घेत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या सूचनेनुसार कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दूरशिक्षण विभागातील समन्वय, उपकुलसचिव, आदींची बैठक घेतली. त्यात विद्यार्थी हित लक्षात घेऊन लवकरात लवकर स्वयंअध्ययन साहित्य त्याची पुस्तके उपलब्ध करून देण्याची सूचना त्यांनी केली. जूनमध्ये सुरू होणाऱ्या नव्या शैक्षणिक वर्षात एम. ए., बी. ए., च्या विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेतानाच विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य त्यांच्या हातात देता येईल. यादृष्टीने नियोजन करून कार्यवाही सुरू करण्यास त्यांनी सुचविले. त्यानुसार एप्रिल-मे महिन्यांत सर्व अभ्यासक्रमांची पुस्तके तयार ठेवण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याकरिता दूरशिक्षण विभागाने पावले टाकली आहेत.

सकाळ IMPACT

### कुलसचिव पुन्हा आढावा घेणार

■ दूरशिक्षण विभागाकडे विविध १३ अभ्यासक्रमांच्या माध्यमातून आठ हजार ४३८ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्याची पुस्तके उपलब्धतेचा मुद्दा प्रशासनाने प्राधान्याने हाती घेतला आहे. कुलसचिव डॉ. शिंदे यांनी २० मार्चपासून आतापर्यंत या विभागात चारवेळा जाऊन पुस्तक तयारीबाबत आढावा घेतला आहे. येत्या दोन दिवसांमध्ये ते पुन्हा या विभागातील अधिकारी, समन्वयकांची बैठक घेणार आहेत.

### इंग्रजी, मराठीची पुस्तके आठवड्याभरात

■ एम. ए. अभ्यासक्रमाच्या चौथ्या सत्रापर्यंतची विविध अभ्यासक्रमांच्या स्वयंअध्यन साहित्याची पुस्तके आतादेखील उपलब्ध आहेत. इंग्रजी, मराठी विषयाची एक-दोन पुस्तके या आठवड्याभरात विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जातील. नव्या शैक्षणिक वर्षात प्रवेश निश्चित करतानाच विद्यार्थ्यांना पुस्तके देण्यासाठी आमची तयारी सुरू असल्याचे दूरशिक्षण विभागाचे उपकुलसचिव कृष्णा पाटील यांनी सांगितले.

01 APR 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवी अभ्यासक्रमाबरोबरच करता येणार बी.एड.

## बी.ए., बी.कॉम., बीएस्सीसोबतच बी.एड.चा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी

**नानीबाई चिखली : भाऊसाहेब सकट**

राज्यातील महाविद्यालयांमध्ये या वर्षापासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अर्थात एनईपी लागू झाले आहे. राज्यातील जी महाविद्यालये सामंजस्य करार करतील त्या महाविद्यालयांत बीए बीएड, बीकॉम बीएड, बीएस्सी बीएड या नवीन अभ्यासक्रमाला सुरुवात होईल. म्हणजेच पारंपरिक शाखांसोबत बीएडचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी मिळणार आहे . कॉलेजेसने सामंजस्य करार केल्यास जून २०२५ पासून ही सुविधा उपलब्ध होणार आहे.

राज्यात सिंगल फॅकल्टी महाविद्यालयांची संख्या ही अधिक आहे. अशावेळी त्या परिसरातील इतर महाविद्यालयांशी सामंजस्य करार करून, विद्यार्थ्यांना त्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांना तात्पुरता प्रवेश देता येणार आहे. या माध्यमातून विद्यार्थी इतर शाखेतील कोर्स पूर्ण करू शकतील. हा विद्यार्थ्यांचा हक्क असून, महाविद्यालयांनी तो पूर्ण करून देणे बंधनकारक आहे .



एनईपीमुळे आपण सरप्लस होऊ अशी प्राध्यापकांच्या मनात भीती आहे; पण तसे होणार नाही. याउलट प्राध्यापकांचा कार्यभार वाढणार आहे. प्राध्यापकांना संशोधन करण्यासाठी संधी उपलब्ध होणार आहे. तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ऑनजॉब ट्रेनिंग, इंटर्नशिप बाबत प्रश्न पडत आहेत. अशा विद्यार्थ्यांनी शहरी भागातच इंटर्नशिप करावी, असे नाही. ग्रामीण भागातील पतसंस्था, भाजी मार्केट, रुग्णालये, वृत्तपत्रांची कार्यालये या ठिकाणी जाऊन ट्रेनिंग घेता येणार आहे. याच प्रकारे विज्ञान शाखेतील विद्यार्थी लॅण्ड टेस्टिंग, शेतीच्या संदर्भातील कामांमध्ये मदत करू शकतात. स्कूल कनेक्ट उपक्रमातून एनइपीतील मल्टी डिसिप्लिनरी, क्रेडिट कसे मोजावे, याची माहिती वेळोवेळी महाविद्यालयातून देण्यात येणार आहे.

> भोपाळच्या नॅशनल कॉन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन या संस्थेशी सामंजस्य करार केल्यानंतर राज्यातील कोणतेही महाविद्यालय आता बीए बीएड, बीकॉम बीएड, बीएस्सी बीएड अभ्यासक्रम सुरू करू शकेल. इतर अभ्यासक्रमांसोबतच बीएडचा अभ्यासक्रम शिकता येणार आहे. या वर्षी काही महाविद्यालयांनी हा सामंजस्य करार केला आहे.
>
> **- अनिल राव,**
> एनईपी सुकाणू समिती सदस्य, महाराष्ट्र राज्य

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 APR 2025
सकाळ

# भारतीय ज्ञानप्रणालीचा सर्वांगीण विकासावर भर

## डॉ. दत्ता पाटील; वारणा महाविद्यालयात कार्यशाळा

वारणानगर, ता. ३१ : भारतीय ज्ञानप्रणाली मानवाच्या सर्वांगीण विकासावर भर देते. वेद, उपनिषदे, पुराणे, इतिहास, सुभाषिते, विज्ञान, तत्त्वज्ञान, गणित, आयुर्वेद, योग, कला आणि वास्तुकला, हडप्पा संस्कृती, किल्ले, लेणी, वारकरी संप्रदाय इत्यादीसारख्या अनेक विषयांचे सखोल ज्ञान प्रवाहित झाले, असे प्रतिपादन गडहिंग्लजच्या घाळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. दत्ता पाटील यांनी केले.

यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयात महाराष्ट्र शासन आणि शिवाजी विद्यापीठ 'परिस-स्पर्श' योजनेंतर्गत मराठी व इंग्रजी विभागातर्फे कार्यशाळेत 'भारतीय ज्ञानप्रणाली' विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए. एम. शेख होते.

अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे सहयोगी प्राध्यापक डॉ. सागर सुतार यांच्या हस्ते उद्‍घाटन झाले. डॉ. सागर सुतार म्हणाले, "विद्यार्थ्यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास केला तर रोजगाराच्या संधी आपोआपच निर्माण होतात." दुसऱ्या सत्रात व्यंकटेश महाविद्यालयातील नॅक समन्वयक डॉ. शुभांगी जरंडीकर म्हणाल्या, "नॅक भारतातील उच्चशिक्षण संस्थांच्या गुणवत्तेचे मूल्यांकन आणि मान्यता देणारी स्वायत्त संस्था आहे."



वारणानगर : येथील वारणा महाविद्यालयात मराठी व इंग्रजी विभाग आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. दत्ता पाटील.

कार्यशाळेत शोभाताई कोरे कन्या महाविद्यालय मलकापूर, अशोकराव माने ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट वाठार, घोडावत कन्या महाविद्यालय जयसिंगपूर, यशवंत शिक्षणशास्त्र महाविद्यालय कोडोली व वारणा महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले. कार्यशाळा संघटन सचिव प्रा. डॉ. सर्जेराव जाधव, डॉ. प्राजक्ता आहुजा, प्रा. माधुरी खुजट यांनी विशेष परिश्रम घेतले. साक्षी राऊत यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. भीमराव वानोळे यांनी आभार मानले. कार्यशाळेस आमदार डॉ. विनय कोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी, प्राचार्य डॉ. ए. एम. शेख, प्रा. यू. डी. कदम यांचे मार्गदर्शन लाभले.